Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र. **F**

# Paper-II
# SOCIOLOGY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................

(Name) ................................................

2. (Signature) ........................................

(Name) ................................................

Seat No. [ ]

(In figures as in Admit Card)

Seat No. ............................................................

(In words)

OMR Sheet No. [ ]

(To be filled by the Candidate)

# AUG - 14215

**Time Allowed : 1¼ Hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24** Number of Questions in this Booklet : **50**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **50** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-II will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **50** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# Sociology
## Paper II
# समाजशास्त्र
## प्रश्नपत्रिका II

Time Allowed : 75 Minutes] [Maximum Marks : 100

**Note** : This paper contains **Fifty (50)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Which of the following is an example of ascribed status ?
   - (A) Father
   - (B) Husband
   - (C) Woman
   - (D) Doctor

1. खालीलपैकी कोणते अर्पित दर्जाचे उदाहरण आहे ?
   - (A) पिता
   - (B) पती
   - (C) स्त्री
   - (D) डॉक्टर

2. Which of the following is *not* a type of interview ?
   - (A) Focused interview
   - (B) Directive interview
   - (C) Functional interview
   - (D) Indepth interview

2. खालीलपैकी कोणता मुलाखतीचा प्रकार **नाही** ?
   - (A) केंद्रित मुलाखत
   - (B) मार्गदर्शक मुलाखत
   - (C) कार्यात्मक मुलाखत
   - (D) सखोल मुलाखत

3. The function has been classified by Merton as ................... .

(A) Manifest and Latent

(B) Objective and Subjective

(C) Involved and Relative

(D) Dormant and Latent

4. Culture pertains to ................... .

(A) Social heritage

(B) Social etiquette

(C) Religious and moral attitudes

(D) Mode of production

5. Role conflict is a major phenomenon of ............................ .

(A) Primitive Society

(B) Agrarian Society

(C) Militant Society

(D) Industrial Society

3. मर्टन यांनी प्रकार्याचे कशा प्रकारे वर्गीकरण केले आहे ?

(A) प्रकट आणि अप्रकट

(B) वस्तुनिष्ठ आणि व्यक्तिनिष्ठ

(C) अंतर्भूत आणि सापेक्ष

(D) सुप्त आणि अप्रकट

4. संस्कृतीचा संबंध कशाशी आहे ?

(A) सामाजिक वारसा

(B) सामाजिक शिष्टाचार

(C) धार्मिक आणि नैतिक अभिवृत्ती

(D) उत्पादन पद्धती

5. भूमिका संघर्ष ही प्रमुख बाब खालीलपैकी कोणत्या समाजात दिसून येते ?

(A) आदिम समाज

(B) कृषक् समाज

(C) सैनिकी समाज

(D) औद्योगिक समाज

6. Which of the following is the *correct* statement about 'norm' ?

(A) an abstract pattern of interaction

(B) an abstract pattern of behaviour

(C) an abstract pattern of culture

(D) an abstract pattern of values

7. The evolutionary perspective of stratification is stated by ......... .

(A) Gerhard Lenski

(B) Ralf Dahrendorf

(C) Davis and Moore

(D) Karl Marx

8. Who among the following developed socialization theory of collective representation ?

(A) M. Weber

(B) C.H. Cooley

(C) G.H. Mead

(D) E. Durkheim

6. खालीलपैकी 'नियमना' संबंधी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(A) आंतरक्रियेचा अमूर्त प्रकार

(B) वर्तनाचा अमूर्त प्रकार

(C) संस्कृतीचा अमूर्त प्रकार

(D) मूल्यांचा अमूर्त प्रकार

7. सामाजिक स्तरीकरणाविषयक उत्क्रांतीवादी दृष्टिकोण कोणी प्रतिपादन केला ?

(A) गेऱ्हॉर्ड लेन्स्की

(B) राल्फ डहरेन्डॉर्फ

(C) डेव्हिस आणि मूर

(D) कार्ल मार्क्स

8. खालीलपैकी कोणी सामाजिकीकरणाचा सामूहिक प्रतिनिधित्व सिद्धांत मांडला ?

(A) एम्. वेबर

(B) सी.एच. कुले

(C) जी.एच्. मीड

(D) इ. डरखिम

9. Socialization is a process involving :

(*i*) internalization of social norms

(*ii*) gradual changing of organism

(*iii*) declaring everything as belonging to the society

(*iv*) training to adopt to society

Find the *correct* combination according to the code :

**Codes :**

(A) (*ii*) and (*iii*)

(B) (*i*) and (*ii*)

(C) (*i*), (*ii*) and (*iii*)

(D) (*i*) and (*iv*)

10. Which of the following terms is *not* related with sociology as a science ?

(A) Empirical science

(B) Synoptic science

(C) Positive science

(D) Formative science

11. The simplest form of measure of dispersion is :

(A) Frequency distribution

(B) Range

(C) Correlation

(D) Association

9. सामाजिकीकरण ही एक प्रक्रिया असून ज्यामध्ये :

(*i*) सामाजिक नियमनांचे आंतरीकरण

(*ii*) जैविकतेत हळूवार परिवर्तन होणे

(*iii*) सर्व काही समाजावर अवलंबून आहे असे जाहिर केले जाते

(*iv*) समाजाशी अनुकूलन साधणे

खाली दिलेल्या संकेतांकामधून **अचूक** पर्याय निवडा :

**संकेतांक :**

(A) (*ii*) व (*iii*)

(B) (*i*) व (*ii*)

(C) (*i*), (*ii*) व (*iii*)

(D) (*i*) व (*iv*)

10. खालीलपैकी कोणती परिभाषा एक विज्ञान म्हणून समाजशास्त्राशी संबंधित **नाही** ?

(A) अनुभवाश्रित विज्ञान

(B) साररूप विज्ञान

(C) वस्तुनिष्ठ विज्ञान

(D) आदर्शदर्शी विज्ञान

11. विकीरणाच्या परिमापनाचा सर्वात सोपा प्रकार म्हणजे :

(A) वारंवारता वितरण

(B) कक्षा

(C) सहसंबंध

(D) साहचर्य

12. The median refers to :

(A) Value of the middle items

(B) Value of the extreme items

(C) Average

(D) Lowest value

13. Reliability means :

(A) Data from known source

(B) Consistency of measurement of a concept

(C) Report based on reliable data

(D) Measuring correlation

14. 'The mores can make anything Right and Prevent the condemnation of Anything.' Who made this statement ?

(A) Johnson

(B) Summner

(C) Gillin and Gillin

(D) Shepard

15. Qualitative research *does not* include :

(A) Emphasis on process

(B) Subjective interpretation

(C) Analysis of context

(D) Objectivity of researcher

12. मध्यमा ...................... सूचित करते.

(A) मध्यावर असलेल्या घटकांचे मूल्य

(B) टोकाच्या घटकांचे मूल्य

(C) सरासरी

(D) न्यूनतम मूल्य

13. विश्वासार्हता म्हणजे :

(A) ज्ञात स्रोतातून मिळवलेली तथ्यसामग्री

(B) एखाद्या संकल्पनेच्या परिमापनातील सुसंगतता

(C) विश्वासार्ह तथ्यसामग्रीवर आधारलेला अहवाल

(D) सहसंबंधाचे परिमापन

14. 'लोकनिती कोणत्याही गोष्टी योग्य करू शकतात आणि कोणत्याही गोष्टींची निंदानालस्ती थांबवू शकतात.' हे विधान कोणी केले आहे ?

(A) जॉन्सन

(B) सम्नर

(C) गिलीन आणि गिलीन

(D) शेपर्ड

15. गुणात्मक संशोधनात .................. चा अंतर्भाव होत **नाही**.

(A) प्रक्रियेवर भर

(B) व्यक्तिनिष्ठ अन्वयार्थ

(C) संदर्भाचे विश्लेषण

(D) संशोधकाची वस्तुनिष्ठता

16. Match the following and choose the *correct* answer from the codes given below :

**Methods**

(*a*) Participant observation

(*b*) Questionnaire

(*c*) Case study

(*d*) Interview

**Studies**

(*i*) American Soldier

(*ii*) Street Corner Society

(*iii*) Suicide

(*iv*) Five Families

(*v*) The Affluent Worker

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) |
| (B) | (*ii*) | (*v*) | (*iii*) | (*i*) |
| (C) | (*ii*) | (*v*) | (*iv*) | (*i*) |
| (D) | (*iv*) | (*iii*) | (*i*) | (*ii*) |

17. In content analysis the unit of analysis is *not* :

(A) Words

(B) Individual Behaviour

(C) Sentences

(D) Images

16. जोड्या लावा आणि खाली दिलेल्या संकेतामधून योग्य उत्तर निवडा :

**अभ्यासपद्धत**

(*a*) सहभागी निरीक्षण

(*b*) प्रश्नावली

(*c*) व्यष्टी अभ्यास

(*d*) मुलाखत

**अभ्यास**

(*i*) अमेरिकन सोल्जर

(*ii*) स्ट्रीट कॉर्नर सोसायटी

(*iii*) सुईसाईड

(*iv*) फाईव्ह फॅमिलीज

(*v*) द अफ्लुअन्ट वर्कर

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) |
| (B) | (*ii*) | (*v*) | (*iii*) | (*i*) |
| (C) | (*ii*) | (*v*) | (*iv*) | (*i*) |
| (D) | (*iv*) | (*iii*) | (*i*) | (*ii*) |

17. आशय विश्लेषणात खालीलपैकी कोणते विश्लेषणाचे एकक **नाही** ?

(A) शब्द

(B) व्यक्तिगत वर्तन

(C) वाक्ये

(D) प्रतिमा

18. The quality of consistency in measurement is known as :

(A) Reliability

(B) Objectivity

(C) Validity

(D) Verifiability

19. Given below are two statements, one is labelled as Assertion (A) and the other is labelled as Reason (R) :

**Assertion (A) :**

Formulation of hypothesis helps to delimit the field of inquiry by singling out the pertinent facts.

**Reason (R) :**

It is a mistake to consider hypotheses as facts, no matter how systematically they have been formulated.

Select the *correct* option :

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

18. परिमापनाच्या सुसंगततेची गुणात्मकता म्हणजे :

(A) विश्वासार्हता

(B) वस्तुनिष्ठता

(C) वैधता

(D) पडताळणीयोग्यता

19. खाली एक प्रतिपादन (A) आणि दुसऱ्यास कारण (R) असे संबोधले आहे :

**प्रतिपादन (A) :**

गृहितकांच्या मांडणीमुळे उचित तथ्यांना वेगळे काढून अध्ययनाचे क्षेत्र सीमित करता येते.

**कारण (R) :**

कितीही सुव्यवस्थित मांडणी केली असली, तरी गृहितकाला तथ्यसामग्री मानणे चूक ठरते.

**योग्य** पर्याय निवडा :

(A) (A) व (R) ही दोन्ही विधाने बरोबर आहेत, आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) (A) व (R) ही दोन्ही विधाने बरोबर आहेत, पण (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे पण (R) हे चूक आहे

(D) (A) चूक आहे पण (R) हे बरोबर आहे

20. Which of the following is *not* a type of probability sampling ?
    (A) Simple random
    (B) Snowball
    (C) Systematic
    (D) Stratified
21. The method used to analyse relationship between variables is known as :
    (A) Dispersion
    (B) Multivariate analysis
    (C) Correlational analysis
    (D) Regression
22. Given below are two statements, one is labelled as Assertion (A) and the other is labelled as Reason (R) :

    **Assertion (A) :**

    In participant observation, the observer takes part in the activities of those he observes.

    **Reason (R) :**

    A major problem for the participant observer is that his presence to some degree influence the action of those he observes.

    Select the *correct* option :
    (A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)
    (B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)
    (C) (A) is true but (R) is false
    (D) (A) is false but (R) is true

20. खालीलपैकी कोणता संभाव्यता नमुनानिवडीचा प्रकार **नाही** ?
    (A) सरल यादृच्छिक
    (B) स्नोबॉल
    (C) व्यवस्थाबद्ध
    (D) स्तरितयादृच्छिक
21. चलांमधील संबंधाचे विश्लेषण करण्यासाठी जी पद्धत वापरली जाते ती कोणत्या नावाने ओळखली जाते ?
    (A) विकीरण
    (B) बहुचलीय विश्लेषण
    (C) सहसंबंधी विश्लेषण
    (D) परागति
22. खाली दिलेल्या विधानांत एक प्रतिपादन (A) आणि दुसऱ्यास कारण (R) असे संबोधले आहे :

    **प्रतिपादन (A) :**

    सहभागी निरीक्षणामध्ये निरीक्षक ज्याचे निरीक्षण करतो त्यामधील घटनात तो सहभागी होतो.

    **कारण (R) :**

    सहभागी निरीक्षकाची प्रमुख समस्या म्हणजे त्याची उपस्थिती काही प्रमाणात तो ज्यांचे निरीक्षण करतो, त्यांच्या क्रियांवर परिणाम करतो.

    **योग्य** पर्याय निवडा :
    (A) (A) व (R) ही दोन्ही विधाने बरोबर आहेत, आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे
    (B) (A) व (R) ही दोन्ही विधाने बरोबर आहेत, पण (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही
    (C) (A) बरोबर आहे पण (R) हे चूक आहे
    (D) (A) चूक आहे पण (R) हे बरोबर आहे

23. Which of the following is *not* a type of correlation ?

(A) Positive correlation

(B) Average correlation

(C) Negative correlation

(D) Zero correlation

24. Which of the following terms is used by Burgess for the case study method ?

(A) Positivism

(B) Life History

(C) Cultural Microscope

(D) Social Microscope

25. Which one of the following is *not* an example of a quasi group ?

(A) Income group

(B) Age group

(C) Occupational group

(D) Trade Union

23. खालीलपैकी कोणता सहसंबंधाचा प्रकार **नाही** ?

(A) सकारात्मक सहसंबंध

(B) साधारण सहसंबंध

(C) नकारात्मक सहसंबंध

(D) शून्य सहसंबंध

24. व्यष्टीअध्ययन पद्धतीला बर्जेस यांनी खालीलपैकी कोणती संज्ञा वापरली आहे ?

(A) वस्तुनिष्ठता

(B) जीवनइतिहास

(C) सांस्कृतिक सूक्ष्मदर्शक

(D) सामाजिक सूक्ष्मदर्शक

25. खालीलपैकी कोणते उदाहरण समूहवत् समूहाचे **नव्हे** ?

(A) उत्पन्नाधारीत समूह

(B) वयोमानाधारीत समूह

(C) व्यावसायाधारीत समूह

(D) कामगार संघटना

26. Match the following by selecting the *correct* answer from the codes :

**List I**

**(Thinkers)**

(*a*) Weber

(*b*) Pareto

(*c*) Blumer

(*d*) Mead

**List II**

**(Concepts)**

(*i*) Symbolic interactionism

(*ii*) Generalized other

(*iii*) Ideal types

(*iv*) Circulation of Elites

(*v*) Social fact

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (B) | (*i*) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) |
| (C) | (*iii*) | (*v*) | (*ii*) | (*iv*) |
| (D) | (*ii*) | (*v*) | (*iv*) | (*iii*) |

26. जोड्या लावा आणि उचित पर्याय खाली दिलेल्या संकेतांकातून निवडा :

**सूची I**

**(विचारवंत)**

(*a*) वेबर

(*b*) परेटो

(*c*) ब्लूमर

(*d*) मीड

**सूची II**

**(संकल्पना)**

(*i*) प्रतिकात्मक आंतरक्रियावाद

(*ii*) सामान्यीकृत इतर

(*iii*) आदर्श प्रारूप

(*iv*) शिष्टजनांचे अभिसरण

(*v*) सामाजिक तथ्य

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (B) | (*i*) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) |
| (C) | (*iii*) | (*v*) | (*ii*) | (*iv*) |
| (D) | (*ii*) | (*v*) | (*iv*) | (*iii*) |

27. On which of the following grounds Marx's theory is mostly criticized ?
   (A) Excessive emphasis on economic factor
   (B) Excessive emphasis on culture
   (C) Excessive emphasis on ideology
   (D) Excessive emphasis on state

28. Match the following by selecting the *correct* answer from the codes :

**List I**

**(Thinkers)**

(*a*) Malinowski
(*b*) Durkheim
(*c*) Parsons
(*d*) Collins

**List II**

**(Concepts)**

(*i*) Solidarity
(*ii*) Materialism
(*iii*) Functional pre-requisites
(*iv*) Conflict theory of stratification
(*v*) Universal functionalism

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) |
| (B) | (*ii*) | (*v*) | (*iv*) | (*i*) |
| (C) | (*v*) | (*i*) | (*iii*) | (*iv*) |
| (D) | (*v*) | (*i*) | (*iv*) | (*ii*) |

27. मार्क्सच्या सिद्धांतावर प्रामुख्याने खालीलपैकी कोणत्या आधारावर टिका करण्यात आलेली आहे ?
   (A) आर्थिक घटकावर अधिक प्रमाणात भर
   (B) संस्कृतीवर अधिक प्रमाणात भर
   (C) विचारप्रणालीवर अधिक प्रमाणात भर
   (D) राज्यावर अधिक प्रमाणात भर

28. संकेतांकानुसार अचूक उत्तराची निवड करून खालील जोड्या जुळवा :

**यादी I**

**(विचारवंत)**

(*a*) मॅलिनोवस्की
(*b*) डुरखाईम
(*c*) पार्सन्स
(*d*) कॉलिन्स

**यादी II**

**(संकल्पना)**

(*i*) ऐक्य
(*ii*) भौतिकवाद
(*iii*) कार्यात्मक पूर्वावश्यकता
(*iv*) स्तरीकरणाचा संघर्ष सिद्धांत
(*v*) सार्वत्रिक कार्यवाद

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) |
| (B) | (*ii*) | (*v*) | (*iv*) | (*i*) |
| (C) | (*v*) | (*i*) | (*iii*) | (*iv*) |
| (D) | (*v*) | (*i*) | (*iv*) | (*ii*) |

29. On which of the following points interactionism differs from functionalism and Marxism ?

Find the *correct* answer from the codes :

(1) Provides an explanation for human society

(2) Focuses on small scale interaction

(3) Rejects the notion of social system

(4) It does not regard human action as response to the system

**Codes :**

(A) (1) and (2)

(B) (2), (3) and (4)

(C) (3) and (4)

(D) (1), (2) and (4)

30. Functionalist analysis is prominent in the work of the following thinkers. Arrange them chronologically.

(Identify the *correct* sequence from codes)

(*i*) Malinowski

(*ii*) Durkheim

(*iii*) Parsons

(*iv*) Merton

**Codes :**

(A) (*ii*) (*i*) (*iii*) (*iv*)

(B) (*i*) (*ii*) (*iii*) (*iv*)

(C) (*i*) (*iii*) (*ii*) (*iv*)

(D) (*ii*) (*i*) (*iv*) (*iii*)

29. खालीलपैकी कोण-कोणत्या मुद्द्यांवर आंतरक्रियावाद कार्यात्मकवाद आणि मार्क्सवादापेक्षा वेगळा आहे ?

संकेतांकातून योग्य पर्याय निवडा :

(1) मानवी समाजाचे स्पष्टीकरण

(2) सूक्ष्म आंतरक्रियांवर भर

(3) सामाजिक व्यवस्थेची बाब नाकारणे

(4) मानवीक्रिया या व्यवस्थेला दिलेला प्रतिसाद आहे, असे मानत नाही

**संकेतांक :**

(A) (1) आणि (2)

(B) (2), (3) आणि (4)

(C) (3) आणि (4)

(D) (1), (2) आणि (4)

30. खालील विचारवंतांच्या मांडणीत/कार्यात कार्यात्मक विश्लेषण प्रामुख्याने आढळून येते. कालक्रमानुसार त्याची मांडणी करा.

(संकेतांकामधून अचूक क्रमांक निवडा)

(*i*) मॅलीनोव्हस्की

(*ii*) डुरखाईम

(*iii*) पार्सन्स

(*iv*) मर्टन

**संकेतांक :**

(A) (*ii*) (*i*) (*iii*) (*iv*)

(B) (*i*) (*ii*) (*iii*) (*iv*)

(C) (*i*) (*iii*) (*ii*) (*iv*)

(D) (*ii*) (*i*) (*iv*) (*iii*)

31. According to Blumer, symbolic interactionism rests on three basic premises. Which are they ?

(Find the *correct* answer according to codes)

(*i*) The importance of meaning

(*ii*) The source of meaning

(*iii*) Responding to external stimuli

(*iv*) Interpretation

**Codes :**

(A) (*i*) (*ii*) (*iii*)

(B) (*i*) (*iii*) (*iv*)

(C) (*ii*) (*iii*) (*iv*)

(D) (*i*) (*ii*) (*iv*)

32. The mode is :

(A) Central Point

(B) Arithmetic Average

(C) Crude measurement

(D) The size of the most frequently occurring measurement

33. Which one of the following is the significant intellectual roots of symbolic interactionism in general and Mead's work in particular ?

(A) Marxism

(B) Structuralism

(C) Philosophy of Pragmatism

(D) Linguistics

31. ब्लूमरच्या मताप्रमाणे प्रतिकात्मक आंतरक्रियावाद तीन मूलभूत तत्त्वांवर आधारित आहे. ती कोण-कोणती आहेत ?

(संकेतांकातून योग्य उत्तर निवडा)

(*i*) अर्थाचे महत्त्व

(*ii*) अर्थाचे स्रोत

(*iii*) बाह्य उद्दीपनास प्रतिसाद

(*iv*) निर्वचन

**संकेतांक :**

(A) (*i*) (*ii*) (*iii*)

(B) (*i*) (*iii*) (*iv*)

(C) (*ii*) (*iii*) (*iv*)

(D) (*i*) (*ii*) (*iv*)

32. बहुलक म्हणजे :

(A) मध्यबिंदू

(B) अंकगणिती सरासरी

(C) स्थूलपरिमापन

(D) कमाल वारंवारता असणाऱ्या परिमापनाचा अंक

33. प्रतिकात्मक आंतरक्रियावादाला सर्वसामान्यपणे आणि मीडस् यांच्या कार्याला विशेष करून खालीलपैकी कोणता बौद्धीक आधार आहे ?

(A) मार्क्सवाद

(B) संरचनात्मकवाद

(C) फलप्रामाण्यवादाचे तत्वज्ञान

(D) भाषा विज्ञान

34. Who said that any view of social change that did not include concern with conflict phenomena appeared to be seriously deficient ?
(A) Nadel
(B) Levi-Strauss
(C) Merton
(D) Coser

35. Who among the following argued that capitalist society has a dominant ideology that serves the interests of the ruling class ?
(A) M. Weber
(B) V. Pareto
(C) K. Marx
(D) R. Dahrendorf

36. Given below are two statements, one is labelled as Assertion (A) and the other is labelled as Reason (R) :

**Assertion (A) :**

According to Marxism, social change is not a smooth orderly progression which gradually unfolds in harmonius evolution.

**Reason (R) :**

Marxism views that social change proceeds from contradictions built into society which is a source of tension, conflict and change.

Choose the *correct* answer by using the codes given below :

**Codes :**
(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)
(B) (A) is true but (R) is false
(C) (A) is false but (R) is true
(D) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

34. सामाजिक परिवर्तनाचा असा कोणताही दृष्टिकोण ज्यात संघर्ष घटनेचा समावेश नाही, म्हणजे ती अतिशय गंभीर कमतरता आहे, असे कोणी म्हटलेले आहे ?
(A) नाडेल
(B) लेवी-स्ट्रॉस
(C) मर्टन
(D) कोझर

35. भांडवलशाही समाजातील प्रभावी विचारप्रणाली शासक वर्गाचे हितसंबंध पूर्ण करते, असे खालीलपैकी कोणी म्हटले आहे ?
(A) एम्. वेबर
(B) व्ही. परेटो
(C) के. मार्क्स
(D) आर्. डॅऱ्हेनडॉर्फ

36. खाली एक विधान (A) आणि दुसऱ्यास कारण (R) असे संबोधले आहे :

**विधान (A) :**

मार्क्सवाद्यांच्या मते सामाजिक परिवर्तन ही सुव्यवस्थित प्रगति नसून ती हळूवारपणे होणारी, अडथळेविरहित समतोलात्मक उत्क्रांती आहे.

**कारण (R) :**

मार्क्सवाद्यांच्या मते सामाजिक परिवर्तन हे समाजनिर्मित विरोधाभासातून पुढे जाते जे की तणाव, संघर्ष आणि परिवर्तनाचा स्रोत असते.

उपरोक्त विधानासंदर्भात दिलेल्या संकेतांकामधून योग्य उत्तर निवडा :

**संकेतांक :**
(A) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे
(B) (A) हे बरोबर आहे, परंतु (R) हे चूक आहे
(C) (A) हे चूक आहे, परंतु (R) हे बरोबर आहे
(D) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत, परंतु (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

37. Conflict theory primarily focuses on :

(A) Eradication of conflict

(B) Increasing social integration

(C) Change

(D) Equilibrium

38. Match the following by selecting the *correct* answer from the codes :

**Books**

(*a*) Structure and Function in Primitive Society

(*b*) Sexual Life of Savages

(*c*) The Elementary Structure of Kinship

(*d*) The Foundation of Social Anthropology

**Authors**

(*i*) Radcliffe Brown

(*ii*) Levi-Strauss

(*iii*) Malinowski

(*iv*) Parsons

(*v*) Nadel

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iii*) | (*v*) | (*iv*) |
| (B) | (*ii*) | (*iv*) | (*v*) | (*iii*) |
| (C) | (*i*) | (*iii*) | (*ii*) | (*v*) |
| (D) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*v*) |

37. संघर्ष सिद्धांत प्रामुख्याने कोणत्या बाबीवर भर देतो ?

(A) संघर्षाचे निर्मुलन करू शकते

(B) सामाजिक एकता वाढविते

(C) परिवर्तन

(D) संतुलन

38. जोड्या लावा वा संकेतांकातून योग्य पर्याय निवडा :

**ग्रंथ**

(*a*) स्ट्रक्चर अँड फंक्शन इन प्रिमीटीव्ह सोसायटी

(*b*) सेक्सुअल लाईफ ऑफ सॅवेजेस

(*c*) द एलेमेन्टरी स्ट्रक्चर ऑफ किनशिप

(*d*) द फाउन्डेशन ऑफ सोशल अन्थ्रोपॉलॉजी

**लेखक**

(*i*) रॅडक्लिफ ब्राऊन

(*ii*) लेव्ही-स्ट्रॉस

(*iii*) मॅलीनोव्हस्की

(*iv*) पार्सन्स

(*v*) नाडेल

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iii*) | (*v*) | (*iv*) |
| (B) | (*ii*) | (*iv*) | (*v*) | (*iii*) |
| (C) | (*i*) | (*iii*) | (*ii*) | (*v*) |
| (D) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*v*) |

39. Who is mostly associated with social system theory ?

(A) Parsons

(B) Merton

(C) Weber

(D) Nadel

40. Given below are two statements, one is labelled as Assertion (A) and the other is labelled as Reason (R) :

**Assertion (A) :**

The lottery method of picking up names is an example of random sampling.

**Reason (R) :**

In this method, every chit in the box has an equal chance of being picked.

In this context of the above statement, which one of the following is *correct* ?

**Codes :**

(A) (A) and (R) are correct and (R) is the correct explanation of (A)

(B) (A) and (R) are correct but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is correct but (R) is false

(D) (A) is false but (R) is correct

39. सामाजिक व्यवस्थेच्या सिद्धांताशी मोठ्या प्रमाणात कोण संबंधित आहे ?

(A) पार्सन्स

(B) मर्टन

(C) वेबर

(D) नाडेल

40. खाली एक विधान (A) आणि दुसऱ्यास कारण (R) असे संबोधले आहे :

**विधान (A) :**

नावे निवडण्याची लॉटरी पद्धत हे यादृच्छिक नमुना पद्धतीचे एक उदाहरण आहे.

**कारण (R) :**

या अभ्यासपद्धतीत पेटीतील प्रत्येक चिठ्ठीला उचलले जाण्याची समान संधी असते.

उपरोक्त विधानासंदर्भात खालीलपैकी कोणते बरोबर आहे, ते सांगा.

**संकेतांक :**

(A) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत, आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत, परंतु (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) (A) हे बरोबर आहे, परंतु (R) हे चूक आहे

(D) (A) हे चूक आहे, परंतु (R) हे बरोबर आहे

41. According to Pareto most of the human actions are :

(A) Logical

(B) Illogical

(C) Non-logical

(D) Rational

41. परेटोच्या मते, बहुतांश मानवी क्रिया कोणत्या स्वरूपाच्या असतात ?

(A) तार्किक

(B) तर्कविहीन

(C) अतार्किक

(D) तर्कनिष्ठ

42. Which of the following represents a form of differentiation and not stratification ?

(A) Class

(B) Gender

(C) Caste

(D) Sex

42. खालीलपैकी कोणता प्रकार स्तरीकरणाचे नाही, तर विभेदीकरणाचे प्रतिनिधित्व करतो ?

(A) वर्ग

(B) लिंगभाव

(C) जात

(D) लिंग

43. Which of the following indicate quantitative aspect of change ?

(A) Development

(B) Evolution

(C) Progress

(D) Growth

43. खालीलपैकी परिवर्तनाचा कोणता संख्यात्मक घटक आहे ?

(A) विकास

(B) उत्क्रांती

(C) प्रगती

(D) वाढ

44. Which of the following is an important component for differentiating between the social group and social category ?

(A) Reciprocal communication

(B) Geographical location

(C) Formal rules and regulations

(D) Size of the group

44. खालीलपैकी कोणता घटक हा सामाजिक समूह व सामाजिक प्रवर्गामधील फरक करण्यासाठी महत्त्वाच घटक आहे ?

(A) पारस्परिक संप्रेषण

(B) भौगोलिक स्थान

(C) औपचारीक नियम व नियमने

(D) समूहाचा आकार

45. Given below are two statements, one is labelled as Assertion (A) and the other is labelled as Reason (R) :

**Assertion (A) :**

The magic performed by the people living by the sea (like Trobriand islands) before going for fishing in the ocean is a good example of latent function.

**Reason (R) :**

The magical acts tend to have a positive consequence to the system as the actors overcome the fear of the unknown.

In the context of the above statement, which one of the following is *correct* ?

**Codes :**

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

46. Training a girl child to be an obedient woman is an example of :

(A) Adult socialisation

(B) Anticipatory socialization

(C) Anti-socialization

(D) Resocialization

45. खाली एक विधान (A) आणि दुसऱ्यास कारण (R) असे संबोधले आहे :

**विधान (A) :**

समुद्रकाठी राहणाऱ्या लोकांनी (जसे ट्रोब्रिआंड बेटे) महासागरात मासेमारीसाठी जाण्याआधी केलेली जादू हे अप्रकट कार्याचे एक चांगले उदाहरण आहे.

**कारण (R) :**

जादूवर आधारित क्रियांचे व्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होतात, कारण कर्ते अज्ञाताच्या भीतीवर मात करतात.

उपरोक्त विधानाच्या संदर्भात खालीलपैकी कोणते बरोबर आहे, ते सांगा.

**संकेतांक :**

(A) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत, परंतु (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे, परंतु (R) हे चूक आहे

(D) (A) चूक आहे, परंतु (R) हे बरोबर आहे

46. बालिकेला आज्ञाधारक स्त्री बनण्याचे प्रशिक्षण देणे म्हणजे :

(A) प्रौढांचे सामाजिकीकरण

(B) अपेक्षित सामाजिकीकरण

(C) विरोधी सामाजिकीकरण

(D) पुनर्सामाजिकीकरण

47. Which of the following is *not* a characteristic of community ?

(A) Temporary nature

(B) We-feeling

(C) Common way of life

(D) Self-sufficiency

48. Match List I with List II and select the *correct* sequence of codes given below :

List I

(Classification of Groups)

(*a*) Primary-Secondary

(*b*) In-group-Out-group

(*c*) Genetic-Congregate

(*d*) Involuntary-Voluntary

List II

(Sociologists)

(*i*) F.H. Giddings

(*ii*) C.A. Ellwood

(*iii*) F. Tonnies

(*iv*) W.G. Summner

(*v*) C.H. Cooley

Codes :

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*v*) | (*iv*) | (*ii*) | (*i*) |
| (B) | (*v*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (C) | (*v*) | (*iii*) | (*i*) | (*ii*) |
| (D) | (*v*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |

47. खालीलपैकी कोणते समुदायाचे वैशिष्ट्य **नाही** ?

(A) तात्पुरते स्वरूप

(B) आम्हीपणाची भावना

(C) समान जीवनमार्ग

(D) स्वयंपूर्णता

48. यादी I मधील समूहाचे वर्गीकरण आणि यादी II मधील समाजशास्त्रज्ञ यांच्या जोड्या लावून खालीलपैकीत अचूक संकेत निवडा :

**यादी I**

**(समूहाचे वर्गीकरण)**

(*a*) प्राथमिक-दुय्यम

(*b*) अंतर्गत-बहिर्गत

(*c*) जनुकीय-एकत्रित

(*d*) अनैच्छिक-ऐच्छिक

**यादी II**

**(समाजशास्त्रज्ञ)**

(*i*) एफ.एच. गिडिंग्ज

(*ii*) सी.ए. एलवूड

(*iii*) एफ. टोनीस

(*iv*) डब्ल्यू.जी. सम्नर

(*v*) सी.एच. कुले

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*v*) | (*iv*) | (*ii*) | (*i*) |
| (B) | (*v*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (C) | (*v*) | (*iii*) | (*i*) | (*ii*) |
| (D) | (*v*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |

49. Given below are two statements :

**Statement (I) :**

According to Durkheim, altruistic suicide occurs owing to the weak attachment of an individual to the group.

**Statement (II) :**

The suicide of a soldier is an example of altruistic suicide.

In the context of the above statement, which one of the following is *correct* ?

**Codes :**

(A) Statements (I) and (II) are correct

(B) Statements (I) and (II) are incorrect

(C) Statement (I) is correct and (II) is incorrect

(D) Statement (I) is incorrect and (II) is correct

49. खाली दोन विधान दिलेल्या आहेत :

**विधान (I) :**

डुरखाईमच्या मते, व्यक्तीची समुहाशी जेव्हा कमी जवळीक असते तेव्हा परार्थवादी आत्महत्या घडते.

**विधान (II) :**

सैनिकाने केलेली आत्महत्या हे परार्थवादी आत्महत्येचे उदाहरण आहे.

वरील विधानाच्या संदर्भात खालीलपैकी कोणते उत्तर बरोबर आहे ?

**संकेतांक :**

(A) विधान (I) आणि (II) हे बरोबर आहेत

(B) विधान (I) आणि (II) हे चूक आहेत

(C) विधान (I) बरोबर आहे परंतु (II) हे चूक आहे

(D) विधान (I) हे चूक आहे परंतु (II) हे बरोबर आहे

50. In the book 'The Structure of Social Action, Talcott Parsons puts forward AGIL model.' Below are two statements :

**Assertion (A) :**

"G" in the AGIL model refers to goal attainment.

**Reason (R) :**

The political leadership must perform the function of goal attainment.

In the context of the above statements, which one of the following is *correct* ?

**Codes :**

(A) Both (A) and (R) are correct and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are correct but (R) is not the correct explanation of (A)

(C) Statement (A) is correct but (R) is incorrect

(D) Statement (A) is incorrect but (R) is correct

50. 'द स्ट्रक्चर ऑफ सोशल ॲक्शन' या टालकॉट पार्सन्स यांच्या ग्रंथात त्यांनी AGIL प्रारुप मांडले आहे. खाली दोन विधाने दिलेली आहेत :

**विधान (A) :**

AGIL मधील 'G' हे तत्त्व हे साध्यसंप्राप्ती सूचित करते

**कारण (R) :**

राजकीय नेतृत्वाने साध्यसंप्राप्तीचे कार्य केले पाहिजे.

वरील विधानांच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे, ते सांगा :

**संकेतांक :**

(A) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत, परंतु (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे, परंतु (R) हे चूक आहे

(D) (A) चूक आहे, परंतु (R) हे बरोबर आहे

ROUGH WORK